जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४०३ दिनांक - ०१/०६/२०२३**

## आर्थिक गुन्हे शाखा,पुणे शहर

## एपीएस वेल्थ व्हेंचर्सशी संबंधित आरोपी विशाखा अविनाश राठोड यांचा अटकपुर्व जामिन अर्ज मा.सत्र न्यायालय यांनी फेटाळला,गुंतवणुकदारांनी तक्रार देण्याचे पुणे शहर पोलिसांचे आवाहन

एपीएस वेल्थ व्हेंचर्स,बाणेर,पुणे या कंपनीचे संचालक नामे अविनाश अर्जुन राठोड,इतर संचालक तसेच सौ.विशाखा अविनाश राठोड व इतर साथीदार यांनी जादा परताव्याचे आमिष दाखवुन फिर्यादी व साक्षीदार यांना प्रवृत्त करुन वेग-वेगळया स्किम मध्ये गुंतवणूक करुन घेतली व त्यावर जादा परताव्याचे आमिष दाखवुन तसे करार केले. यामध्ये सुरुवातीस काही कालावधीकरिता ठरल्याप्रमाणे परतावा देवुन विश्वास संपादन केला व त्यानंतर करारांचा भंग करुन शेकडो गुंतवणूकदारांची गुंतवणुक व त्यावरील परतावा न देता अपहार करुन फसवणुक केली आहे.

त्याअनुशंगाने **चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे गुरनं.२८१/२०२३,भादविकलम ४२०,४०६,४०९, ३४,सह एमपीआयडी कलम ३,४** अन्वये दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा,पुणे शहर येथे सुरु आहे. आतापर्यंत शेकडो गुंतवणुकदारांनी त्यांचे सुमारे १२२ कोटी ३८ लाख ३२ हजार रुपये व परतावा दिला नसल्याबाबत तक्रार दिलेली आहे. यामध्ये भविष्यात वाढ होण्याची शक्यता आहे.

सदर गुन्हयात आरोपी असलेल्या विशाखा अविनाश राठोड यांचा अटकपुर्व जामिन अर्ज मा.सत्र न्यायालय,पुणे शहर यांनी फेटाळला आहे. या सुनावणीमध्ये सरकारी अभियोक्ता म्हणुन श्री. वाडेकर यांनी काम पाहिले. आर्थिक गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे तपास पथक अविनाश राठोड, विशाखा राठोड व इतर आरोपीत यांचा शोध घेत आहेत.

सदर गुन्हयामध्ये पोलिस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, सह पोलिस आयुक्त,श्री.संदीप कर्णिक, अप्पर पोलिस आयुक्त,गुन्हे शाखा,श्री.रामनाथ पोकळे, पोलिस उप-आयुक्त,आर्थिक व सायबर गुन्हे,पुणे,श्री.श्रीनिवास घाडगे, सहा.पोलिस आयुक्त,आर्थिक व सायबर गुन्हे,पुणे,श्री.विजय पळसुळे, यांचे मार्गदर्शनाखाली अधिक तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक,निलम भगत, सहा.पोलिस निरीक्षक,शैलेश गायकवाड, सहा.पो.फौज.तरटे, पोलीस अंमलदार,झगडे, म.पोलीस अंमलदार,मोहरे व वाघेले हे पथक करीत आहे.

अशा प्रकारे जादा परताव्याचे आमिषाला बळी पडुन **एपीएस वेल्थ व्हेंचर्स,बाणेर,पुणे** या कंपनी मध्ये गुंतवणुक केल्यानंतर फसवणुक झालेल्या सर्व गुंतवणुकदारांनी पोलिस उप-आयुक्त,कार्यालय, आर्थिक गुन्हे शाखा,पुणे शहर येथे संपर्क साधुन तक्रार द्यावी असे आवाहन पुणे शहर पोलिस यांचेकडुन करण्यात येत आहे.